कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 03.11.2020.

**श्री तुळजा देवी शिक्षण प्रसारक मंडळ जालना ता. जि.जालना येथील संस्था अध्यक्ष श्री श्रीराम सवईराम राठोड, वय 59 वर्षे, व्यवसाय संस्था अध्यक्ष ता. जालना जि जालना यांना 34,500/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | आलोसे श्री श्रीराम सवईराम राठोड, वय 59 वर्षे,व्यवसाय संस्था अध्यक्ष,जालना ता. जि. जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक **03.11.2020** रोजी इन्कम टॅक्स कॉलनी (राहते घरी) जालना ता. जि.जालना येथे. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 34,500/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 03.11.2020 रोजी तक्रार दिली की, तक्रारदार हे आलोसे यांच्या श्री तुळजा देवी शिक्षण प्रसारक मंडळ जालना अपंग निवासी विदयालय, आर टी ओ कार्यालय रोड नागेवाडी शिवार ता.जि.जालना येथे शिपाई म्हणुन नोकरीस असुन तक्रारदार यांनी लॉकडाऊन काळामध्ये एप्रिल महिन्यात वडील आजारी असल्याने सुटटीवर गेले होते. सुटटीवरुन हजर होण्यासाठी शाळेवर गेले असंता सदर शाळेचे अध्यक्ष आलोसे यांनी तक्रारदार यांना सागिंतले कि, आता लॉकडाऊन आहे त्यामुळे तुम्ही घरी थांबा. त्यानंतर तक्रारदार हे संस्था अध्यक्ष आलोसे यांना शाळेवर हजर करुन घेण्यासाठी भेटले असता ते म्हणाले कि, तुम्ही चार महिने शाळेत आला नाही तसेच तुमचे पगाराचे पैसे जमा झाल्यावर मला त्यांतील 72,000/- रु दयावे लागतील तरच तुम्हाला शाळेवर हजर करुन तुमचा पगार काढीन. त्याप्रमाणे तक्रारदार यांचा मे व जुन महिन्याचा पगार खात्यावर जमा झाल्यावर तक्रारदार यांनी आलोसे यांना 26,500/- रु दिले. त्यावेळी आलोसे यांनी तक्रारदार यांना शाळेत रुजु करुन घेतले. त्यानंतर तक्रारदार यांचे जुलै ते सप्टेबर पर्यतचे राहिलेला पगार दि. 31.10.2020 रोजी जमा झाल्यावर आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक महिन्याचे 11,500 रु असे तिन महिन्याचे 34,500/- रु आणुन देण्याचे सागिंतले नाहितर मुख्याध्यापक यांना सांगुन इथुन पुढचा पगार देणार नाही व तुला शाळेत येवु देणार नाही असे म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे 34,500/- रुपयांची लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 03.11.2020 रोजी सापळा लावला असता श्री तुळजा देवी शिक्षण प्रसारक मंडळ जालना अपंग निवासी विदयालय, आर टी ओ कार्यालय रोड नागेवाडी शिवार ता.जि.जालना चे अध्यक्ष लोकसेवक श्री श्रीराम सवईराम राठोड, वय 59 वर्ष जालना ता. जि.जालना यांनी 34,500 /- रुपये लाचेची मागणी करुन स्वत: पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने इन्कम टॅक्स कॉलंनी (राहते घरी) जालना ता.जालना जि.जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

श्री तुळजा देवी शिक्षण प्रसारक मंडळ जालना अपंग निवासी विदयालयाचे अध्यक्ष लोकसेवक श्री श्रीराम सवईराम राठोड, वय 59 वर्ष जालना ता. जि.जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.

Scanned with CamScanner